**शैक्षणिक संदर्भ अंक १४४ (ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२३)**

महा इतिहास - भाग २४

# राजकीय क्रांती

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

# राजकीय क्रांती

लेखक : प्रियदर्शिनी कर्वे

*मागील काही लेखांमध्ये आपण औद्योगिक क्रांतीच्या जागतिक परिणामांचा आढावा घेतला. पण औद्योगिकीकरणाबरोबरच सामाजिक व राजकीय उलथापालथीही घडल्या. यापैकी युरोपीय साम्राज्यवादाबद्दल तर आपण जाणतोच, पण युरोपातही देश आणि देशाचा कारभार याबाबतच्या धारणांमध्येही काही आमूलाग्र बदल झाले. त्याचे पडसाद अजूनही जगभरात पडत आहेत. या राजकीय क्रांतीचा इतिहास पाहूया या लेखात.*


१८व्या शतकात इंग्लंडमध्ये व युरोपमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीतूनच देश किंवा राष्ट्र याची जी आपली आधुनिक धारणा आहे ती विकसित झाली आहे.

औद्योगिक क्रांती झाली त्या आगेमागेचा काळ पाहिला तर युरोप-आशिया-आफ्रिका या जोडलेल्या भूभागात सर्वत्र राजेशाही व सरंजामशाही होती. युरोपीय दर्यावर्दी अमेरिका व ऑस्ट्रेलिया खंडांमध्ये पोहचत होते व तिथेही आपापल्या राजांच्या नावानेच मूळ निवासी लोकांवर आपली राजकीय व सांस्कृतिक धोरणे लादू पहात होते.

सर्वप्रथम औद्योगिक क्रांतीचे उगम स्थान असलेल्या इंग्लंडमधील राजकीय स्थित्यंतराचा इतिहास थोडक्यात पाहूया. १७व्या शतकाच्या मध्यात इंग्लंडमध्ये यादवी युद्ध झाले आणि जवळजवळ ५० वर्षे राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर राहिली. १३व्या शतकात इंग्लंडमधील उमराव व तत्कालीन राजा जॉन यांमध्ये एक करार होऊन राजाला सल्ला देणारी उमरावांची व जमीनदारांची सभा या स्वरुपाची संसद अस्तित्वात आली होती.

१७व्या शतकातील यादवी ही राजाला सार्वभौम अधिकार असावे की संसदेला याबाबतच्या मतभेदांतून झाली होती. यातून संसद समर्थक विजयी झाले व राजेशाहीचे अधिकार बऱ्यापैकी संकुचित होऊन संसदेचे राजकीय वजन वाढले. अर्थात ही संसद म्हणजे संरजामशाहीचाच अवतार होता कारण यात वरच्या सभागृहात पिढीजात उमरावांना स्थान होते आणि खालच्या सभागृहाचे सदस्य मतदानाने निवडले जात असले तरी मतदान करण्याचा व निवडणुकीला उभे रहाण्याचा अधिकार फक्त धनिक जमीनदारांना होता. यातही फक्त पुरूषच सक्रीय राजकारणात भाग घेऊ शकत होते, स्त्रियांना यात कोणतेच स्थान नव्हते.

औद्योगिक क्रांतीनंतर कापड गिरण्या व इतर कारखानदार असा एक नवीन उद्योजक व व्यापाऱ्यांचा धनिक वर्ग निर्माण झाला. काही संघर्षानंतर १८३२ साली या वर्गातील पुरूषांना मतदानाचा अधिकार मिळाला. पण तरीही ९० टक्यांहून अधिक लोक या अधिकारापासून वंचित होते व त्यामुळे या पद्धतीने उभी राहत असलेली संसद ही जनतेचे प्रतिनिधित्व करत नसून देशातील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वरच्या वर्गांचेच प्रतिनिधित्व करत होती. गुप्त मतदान पध्दती, मतदारांना आमिषे दाखवण्याला गुन्हा मानले जाणे, सर्व सज्ञान पुरूषांना व नंतर महिलांनाही मतदानाचा अधिकार, या सर्व सुधारणा होईपर्यंत २०वे शतक उजाडले. सर्व सज्ञान




*महिलांना मतदानाच्या अधिकाराची मागणी करण्यासाठी १९०८ साली आयोजित सभा (स्रोत - https://jamesnudes.getarchive.net/amp/media/suffragettes-england-1908-2ca79)*

नागरिकांना मतदानाचा अधिकार असणे, गुप्त मतदानाद्वारे लोकप्रतिनिधी निवडले जाणे आणि त्यांच्यातून मंत्रीमंडळ बनून त्याने प्रांताचा किंवा देशाचा कारभार चालवणे ह्या सर्व पद्धती आता मात्र आपल्याला परिचित आहेत.

इंग्लंडमधील या घडामोडींची जास्त चर्चा होत असली तरी जागतिक पातळीवर लोकशाही मूल्ये सार्वत्रिक बनवणाऱ्या राजकीय क्रांतीची सुरूवात फ्रान्समध्ये झाली असे इतिहासकार मानतात. १६व्या लुईच्या कोणतेही नियंत्रण नसलेल्या राजेशाही अधिपत्याखालील फ्रान्समध्ये १७८०च्या दशकात मोठे आर्थिक संकट उभे राहिले व सर्वसामान्यांचे दैनंदिन जीवन खडतर बनत गेले. इंग्लडबरोबरील वैरापोटी फ्रान्सच्या राजेशाहीने अमेरिकेतील ब्रिटिश वसाहतींना स्वातंत्र्यलढ्यासाठी सैनिक आणि शस्त्रास्त्रे पाठवून मदत केली. एकीकडे सरंजामदारांची आर्थिक उधळपट्टी चालूच होती, त्यात या खर्चाची भर पडली. परिणामतः देशात आर्थिक दिवाळखोरीची परिस्थिती निर्माण झाली. त्याचवेळी अमेरिकेत लढायला गेलेले फ्रेंच सैनिक राजेशाहीच्या जोखडाखालून मुक्ती मिळू शकते या अनुभवाची शिदोरी गाठीला बांधून घरी परतले. सामान्य लोकांसाठी रोजच्या जगण्याची धडपड अधिकाधिक बिकट होत गेली आणि १७८९ मध्ये राज्यक्रांतीच्या रूपाने तणावाचा उद्रेक झाला. राजा आणि अनेक अमीर-उमरावांचे बळी घेतल्यानंतर देशात एक प्रकारची सांसदीय राज्यपद्धती सुरू झाली. आज जगभरातील बहुसंख्य देशांत नांदणाऱ्या



*फ्रेंच राज्यक्रांतीचे प्रतिकात्मक शिल्प*
*(स्रोत – विकीमिडीया)*

लोकशाही सांसदीय राज्यपध्दतीची ही जननी होती. ही नवी राज्यव्यवस्था पूर्वीच्या तुलनेत अधिक लोकाभिमुख असली तरी तिलाही नेपोलियनच्या रूपाने एक सम्राट आवश्यक वाटला होता हे विशेष!

फ्रान्सच्या राजकीय व्यवस्थेत पुढच्या काही दशकांत अनेक स्थित्यंतरे झाली. यातून एक काहीसा विरोधाभास असलेली लोकशाही व्यवस्था उभी राहिली. यात राजकीय ताकदीचे दोन केंद्रबिंदू होते, अतिशय कुशल पण केंद्रित अशी शासकीय नोकरशाही आणि देशभरात विखुरलेले लहान-मोठे खाजगी मालमत्तांचे सधन मालक. इथले औद्योगिकीकरण शासनामार्फत होत होते आणि बहुसंख्य सामान्य लोक शेतीच्या पारंपरिक पद्धती सोडायला फार उत्सुक नव्हते. त्यामुळे राजेशाहीच्या जोखडापासून पूर्णतः मुक्त अशा नव्या राजकीय व्यवस्थेची नांदी फ्रान्समध्ये घातली गेली असली तरी औद्योगिक क्रांती मात्र तिथे अडखळत अडखळतच पसरली.

अमेरिका व फ्रान्स या दोन्ही देशांत पाठोपाठ राज्यक्रांती झाली असली तरी लोकशाही राज्यव्यवस्थेची वाटचाल वेगवेगळया प्रकारे झाली. अमेरिकी स्वातंत्र्य हे अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या युरोपियनांनी आपल्या मातृसत्तांपासून मिळवलेले स्वातंत्र्य होते. तिथल्या मूल निवासी आदिवासींच्या पारतंत्र्याचे हे एक वेगळे पर्व सुरू झाले, इतकाच फरक त्यांच्या दृष्टीने झालेला होता. पण त्यांच्या अंतर्गत राज्यव्यवस्था आधीच



*अमेरिकन स्वातंत्र्याची उद्घोषणा. १७७६ सालच्या या ऐतिहासिक प्रसंगाचे जॉन ट्रमबुल या चित्रकाराने १८१८ साली काढलेले तैलचित्र (स्रोत - विकीपिडिया)*


मोडीत निघालेल्या होत्या. अमेरिकेतील गोऱ्या लोकांसाठी ही भूमी आणि इथला समाज ही कोरी पाटी होती. त्यात अर्थातच निर्णयाचे सर्व अधिकार गोऱ्या लोकांच्याच हातात होते, आदिवासी व गुलामांना काहीही स्थान नव्हते. गोऱ्या लोकांची लोकसंख्या खूपच कमी व विखुरलेली होती. त्यामुळे केंद्रित नोकरशाहीची वाढ इथे फार मंदगतीने झाली. मतदानाचा अधिकार सुरूवातीला अर्थातच फक्त गोऱ्या पुरूषांना होता आणि स्त्रियांना आणि इतर समूहांना मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी शतकभर लढे द्यावे लागले.

इंग्लंडनंतर जर्मनीमध्येही १८४८ साली राजेशाहीच्या छायेत मतदानाने निवडलेल्या प्रतिनिधींची संसद अशा स्वरूपाची रचना उभी राहिली. पण इंग्लंडमध्ये या रचनेतून हळूहळू राजपदावरील व्यक्तीचे अधिकार संकुचित होत गेले तर जर्मनीत या रचनेचा वापर लोकांमध्ये राजनिष्ठा कायम ठेवण्यासाठी केला गेला.

२०व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत या साऱ्या घडामोडींतून युरोप व युरोपातून स्वातंत्र्य मिळवलेली अमेरिका या ठिकाणी देश किंवा राष्ट्र या आधुनिक संकल्पनेची पायाभरणी झालेली होती.

माणसे शेती करू लागली तेव्हा उमराव-जमीनदार व त्यांची प्रजा अशी संरजामशाही रचना उभी राहिली होती. जितक्या जास्त जमिनीवर नियंत्रण व जितकी जास्त प्रजा तितकी त्या जमीनदाराची राजकीय ताकद मोठी होती. शहरीकरणाचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी आद्य संस्कृतींमधील राजकीय व्यवस्था - कर आकारणी, कायदे, व त्यासाठीची नोकरशाही यंत्रणा, इ. - उभी राहिली होती. कोणता उमराव किती कर भरणार हे त्याच्या मालकीचे जमिनीचे क्षेत्रफळ व शेतीतून मिळणारे उत्पन्न याच्याआधारे दरवर्षी ठरवले जात होते. औद्योगिकीकरणामुळे जमीन मालक नसलेल्या कारखानदारांकडे संपत्ती आली आणि

करआकारणीचे नियमही बदलत गेले. कारखानदारांकडून मिळणारा पैसा सरकार चालवण्यासाठी आवश्यक झाला आणि त्याबदल्यात त्यांना राजकीय अधिकार देणेही भाग पडले. राजकीय अधिकारांचे हे किलकिले झालेले दार इतर समूहांनी संघर्ष करून अधिकाधिक सताड उघडत नेले. आता प्रजा ही नागरिक बनली. सैन्य, पोलिस, नोकरशाही,



न्यायदानाची यंत्रणा ही शासनाची अंगे अधिकाधिक शक्तीशाली बनत गेली. शासन विविध मार्गांनी सर्वांकडून करआकारणी करू लागले. जमिनीचा वापर, वित्तपुरवठा या सर्व गोष्टी शासन नियंत्रित झाल्या. नागरिकांच्या जीवनात शासनाचा हस्तक्षेपही वाढला. उदा. आपल्या मुलांना आपल्या उद्योगात कामाला न लावता शाळा शिकायला पाठवणे पालकांसाठी बंधनकारक झाले.

अर्थात या साऱ्याच्या मोबदल्यात शासनव्यवस्था नागरिकांच्या हितरक्षणासाठी अनेक गोष्टी करण्यास बाध्यही झाली. नागरिकांचे जीवन सुकर करणाऱ्या रस्ते, पाणी पुरवठा, इ. मूलभूत सोयीसुविधा, संरक्षण, शिक्षण, आरोग्यव्यवस्था, इ. सर्व सेवा शासनयंत्रणा पुरवू लागल्या. नागरिकांमध्ये एकजूट व शासनयंत्रणेप्रती बांधिलकी निर्माण होण्यासाठी प्रत्येक राष्ट्राचे तत्त्वज्ञान व प्रतीके तयार होऊ लागली व नागरिकांमध्ये देशप्रेमाची भावना जागवली गेली. एक संस्कृती, एक भाषा, एक धर्म, अशा विविध निकषांवर देश किंवा राष्ट्र ही संकल्पना उभी राहिली आहे.

आज जगाच्या बहुतेक सर्व भागात आपल्या देशाबद्दल नागरिकांची भावनिक बांधिलकी सार्वत्रिक झाली आहे. शासक निवडण्याची लोकशाही पद्धती काही ठिकाणी

चांगली रुजली आहे, तर काही ठिकाणी तिचे अस्तित्व अधूनमधून धोक्यातही येते. निवडून आलेली शासने उलथवून हुकूमशहा उदयाला येतात. पण आधुनिक जगात हुकूमशहासुध्दा लुटुपुटीचे मतदान घडवून आणणे, फारसे अधिकार नसलेली का होईना पण संसद उभी करणे, असे प्रकार करताना दिसतात. यावरून लोकशाहीचा आभास निर्माण करणे त्यांना गरजेचे वाटते हे उघड आहे. जगात काही ठिकाणी अजूनही राजेशाहीसुध्दा थोड्याफार प्रमाणात टिकून आहे. पण नोकरशाही व एकंदर शासनयंत्रणेचे स्वरूप जगभरात सारखेच बनले आहे.

आज आपले प्रत्येकाचे राष्ट्रीयत्व हा आपल्या व्यक्तिगत ओळखीतला एक अगदी मूलभूत व स्वाभाविक भाग बनला आहे. पण ही संकल्पना जेमतेम दोनशे वर्षे जुनी आहे! आज अगदी खेळासारख्या निखळ आनंद देणाऱ्या गोष्टीकडेही देशप्रेमाच्या भावनेतून पाहीले जाते. पण भविष्यात ही संकल्पना किती काळ टिकेल? नवीन कोणती राजकीय संकल्पना उदयाला येईल? भावी पिढ्या आपल्या देशप्रेमाच्या विविधांगी आविष्कारांकडे कोणत्या नजरेने पाहतील?

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी - बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी, युरोप, राज्यक्रांती, लोकशाही, राष्ट्रीयत्व)*

## शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

**२०१८ सालापासून 'शैक्षणिक संदर्भ' या इ-अंकातील दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिन्यांनी आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आम्ही नियमित पोहोचवत आहोत. आम्ही करत असलेला हा प्रयास किती वाचकांना आवडतो/ उपयोगी पडतो याबद्दल आम्हाला जाणून घ्यायला आवडेल.**

- **आपल्याला आमचे लेख व अंक नियमित मिळतात का ?**
- **आपण दरमहा किती लेख वाचता ?**
- **त्यातील किती लेख आवडतात ?**
- **त्यावर आपण कधी प्रतिक्रिया, सूचना दिली आहे का ?**

**याबद्दल आम्हाला sandarbh.marathi@gmail.com या इमेलवर जरूर कळवा.**

**आमच्या www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंक त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. वाचू शकता, डाऊनलोड करू शकता.**

या उपक्रमासाठी आपली ऐच्छिक देणगी संदर्भ सोसायटीकडे खालील अकाऊंटमध्ये जमा करू शकता, केल्यानंतर वरील इ-पत्त्यावर तशी मेल करा.. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.

इ-पेमेंट : Sandarbh Society

Account No.: 20047006634

Bank of Maharashtra, Mayur Colony, Pune

IFS Code: MAHB0000852

**- संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी**